**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०४/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री दत्त रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | उपविभागीय अधिकारी पंढरपूर, जि. सोलापूर | सहाय्यक जिल्हाधिकारी, सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालय पंढरपूर जि. सोलापूर | पंढरपूर विभागामध्ये प्रत्येक तालुक्यात विहित परवाना न देता तात्पुरत्या स्वरूपाची किरकोळ रॉकेल विक्रीकेंद्रे किती चालू होती. याबाबतचा सविस्तर खुलासा व्हावा. | अपीलकर्त्यास आवश्यक माहिती दिल्याची अपीलकर्त्यांची पोच जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १७.६.२००८ रोजीच्या ' विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रासोबत सादर केली. |
| २ | ४०९/ सोलापूर | श्री. शेंकुंबर तुकाराम फंड २७/५, मुरारजी पेठ, निराळे वस्ती, सोलापूर | अधीक्षक, भूमी मालमत्ता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | सहायक आयुक्त (वि.), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | सोलापूर महानगरपालिकेने १९९० पासून ज्या जागा भाडेपट्याने दिल्या आहेत त्यांचा सिटी सर्व्हे नं, क्षेत्रफळ, नाव व पत्ता इत्यादी माहिती | माहिती देण्यात आल्याने उभय घटकांमध्ये एकमत होऊन अपील निकाली काढण्याचे दि. १७.६.२००८ रोजीच्या ' विशेंष अपिल निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ४२६/ सोलापूर | श्री. दिपक दगडू ढेकणे मु. पो. काटी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | मुख्याध्यापक, शारदादेवी प्रशाला वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | अध्यक्ष, कै. उध्दवरावजी क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | सहशिक्षिका कु. संघमित्रा वाघमारे यांचा नियुक्ती आदेश, शिक्षक मान्यता सत्यप्रत, १९९८ - ९९ ते २००५ - ०६ सालातील सेवक संच, १०० बिंदू नामावली, सेवा ज्येष्ठता यादी इत्यादी. | अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी दि. १३. ८. २००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४५४/ सोलापूर | श्री. विलास आण्णा खरात विद्यानगर, अंबिकानगर, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, शारदादेवी प्रशाला वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | अध्यक्ष, कै. उध्दवरावजी पाटील क्रिडा व शिक्षण मंडळ, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | शैक्षणिक वर्ष २००१ ते २००७ मधील शालेय समितीच्या सभेचे इतिवृत्त व सदस्यांची नावे व पत्यासह तपशील. | आवश्यक माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याचे अपीलकर्त्याचे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.८. २००९ रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केले. |
| ५ | ४९१/ सोलापूर | श्री. विजयसिंग छत्तरसिंग गुंगवाले घं. नं. ६३, उत्तर सदर बझार, सोलापूर | माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, २८, क्वीन्स गार्डन, पुणे- १ | अपिलीय अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-१ | श्री. मनोज प्रकाश यलगुलवार यांच्या जात पडताळणी करिता त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती इत्यादी. | अन्य व्यक्तींची मागणी त्रयस्थ पक्ष - मान्यतेशिवाय मान्य करता येणार नाही, हा अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र. ०४ / सोलापूर, ४०९ / सोलापूर, ४२६/ सोलापूर,४५४ / सोलापूर व ४९१ / सोलापूर ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**

**दि.१०.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १००१/ २००९/ सोलापूर | श्री. राजू आण्णासो चव्हाण मु.पो.आंधळगाव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | १) निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मंगळवेढा, जि. सोलापूर २) जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर | - | मौजे आंधळगाव येथील श्री. बी. टी. माळी, किरकोळ केरोसिन विक्रेते यांच्या विक्री परवानाच्या संदर्भात ६ मुद्दयांची माहिती. | १) अपिलकर्त्याने दोन वेगवेगळया माहिती अर्जांच्या अनुषंगाने एकत्र अपील केले आहे. तसेच प्रथम अपिल केलेले नाही. २) प्रत्येक माहिती अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. |
| २ | ११०२/ २००९/ सोलापूर | श्री. दिपक बाबुराव तेलंग ३७१, ग. ह. झोपडपट्टी, नं.०२, संजयनगर, विजापूर नाका, सोलापूर | जगदंबा बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्था, तुळजापूर, जि. उस्मानाबाद | - | संस्थेला जिल्हा निबंधकाकडून मिळालेल्या नोंदणी पत्राची प्रत, कार्यकारी मंडळाची यादी, संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या योजणांची माहिती, संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या आश्रम शाळेतील कर्मचा-यांच्या नेमणुकी -सबंधातील माहिती व वार्षिक तपासणी अहवालाची प्रत अशा एकूण ११ मुद्दयांची माहिती. | अपीलकर्त्याने प्रथम अपील केले नसल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसून येते. ते करावे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ११०४/ २००९/ सोलापूर | श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप मु. महागांव, पो. बावी, ता. बार्शी, जि. सोलापूर | विभागीय समाज कल्याण अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर | अतिरिक्त संचालक समाजकल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य, ३, चर्च रोड, पुणे - १ | आवश्यक कागदपत्रांअभावी अपिलकर्त्याच्या मूळ माहिती अर्जातील मागणीचा बोध होत नाही. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ ( अपील क्र १००१/२००९/सोलापूर, ११०२/२००९/सोलापूर, व ११०४/२००९/सोलापूर,) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**

**दि.१५.०९.२००९**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १००२/ २००९/ पुणे | श्री.विजय हरिभाऊ देशपांडे फ्लॅट नं.५, गजेंद्र अपार्टमेंट, दर्शन हॉलच्या मागे, तानाजी नगर, चिंचवड, पुणे-३३ | लिपिक, कुर्डुवाडी नगरपरिषद कार्यालय, ता.कुर्डुवाडी, जि.सोलापूर | मुख्याधिकारी, कुर्डुवाडी नगरपरिषद कार्यालय, ता.कुर्डुवाडी, जि.सोलापूर | सेवा पुस्तकाची प्रमाणित प्रत, दि.८.१२.१९९९ व दि.२०.११.२००७ रोजीच्या अनुक्रमे ठराव क्र.९११ व ठराव क्र.१५९५ ची नक्कल तसेच दि.१.०४.२००८ ते दि.७.०७.२००८ पर्यंतच्या आवक-जावक रजिस्टरच्या प्रती | आवश्यक माहिती मिळाली असल्याने अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्त्याने दि.२७.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | १०७९/ २००९ / पुणे | तळेगाव दाभाडे सिटीझन फोरम, जी-६, किनारा, द्वारा नंदा टायर्स, तळेगाव चाकण रोड, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | ओव्हरसिअर, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | दि.१८.०५.२००९ रोजी दैनिक 'पुढारी' या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा जा.क्र.६३६/२००९-नुसार मेजरमेंट शिट , सर्व कामांचा स्थळदर्शक नकाशा, आर्थिक तरतुदींचा अहवाल व नगरपरिषदेची अर्थसंकल्पीय शिल्लक तरतूद इ.बाबी | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ६(१) नुसार अपील व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक आहे, पदनामाने नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २४५४/ पुणे | श्री.गजेंद्र सिंग फ्लॅट नं.१ भोसले इलाईट, प्लाट नं.२६, भोसले नगर, पुणे-७ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, संगम पुलाजवळ, पुणे | प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, संगम पुलाजवळ, पुणे | मुंबई मोटार वाहन कर कायदा, १९५८ मधील तरतुदीनुसार एक रकमी कर आकारणी बाबतची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.४.०९.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. १००२/२००९/पुणे, १०७९/२००९/पुणे व २४५४/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३ /०९ /२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खलीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१२/ २००९/ कोल्हापूर | श्रीमती बया विष्णू भोरे ७१३, ए - वॉर्ड, राजाराम चौक, गंजीमाळ, गुलाब बारगीर समोर, कोल्हापूर | १) नगर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर, २) माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर | १) उप आयुक्त, कोल्हापूर महागरपालिका, कोल्हापूर २) प्रथम अपिलीय प्राधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर | झोपडपट्टी कार्डाबाबत व झ्‍ोपडपट्टी हस्तांतरणाबाबतची माहिती | अपीलकर्त्याने दोन वेगवेगळ्या माहिती मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील दाखल करावे. |
| २ | १०१३/ २००९/ कोल्हापूर | डॉ. अ. आ. हिरेमठ मु.पो.नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | १) जन माहिती अधिकारी, डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर २) जन माहिती अधिकारी, डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ॲड रिसर्च सेंटर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | १) अपिलीय प्राधिकारी, डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर २) अपिलीय प्राधिकारी, डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ॲड रिसर्च सेंटर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | वेतनश्रेणी लागू करुन फरकासह व व्याजासह रक्कम मिळावी | १) अपीलकर्त्याने दोन वेगवेगळ्या माहिती मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील दाखल केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील दाखल करावे. २) संबंधित संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरते, याचे पुरावे अपीलकर्त्याने दाखल करणे आवश्यक आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ३) अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | १०१७/ २००९/ कोल्हापूर | श्री. सतीश नरसू मोरे सिध्दार्थ नगर, मु.पो.पेठवडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | उपनिबंधक सहाकारी संस्था, हातकणंगले, जि.कोल्हापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर | १) कृषि उत्पन्न बाजार समिती, पेठवडगांव यांचे अधिकार क्षेत्रात हॉटेल्स किती आहेत, त्यांना परवाना आहे काय, त्यांच्याकडून फी किती आकारली जाते वगैरे सह एकूण तीन मुद्दयांची माहिती<br>२) कृषिराज नागरी सहकारी पत संस्था, पेठवडगांवशी संबंधित एकूण आठ मुद्दयांची माहिती. | १) अपीलकर्त्याने दोन वेगवेगळ्या माहिती मागणी अर्जासाठी एकत्रित अपील दाखल केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपिल दाखल करावे<br>२) नागरी सहकारी पत संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे असणे आवश्यक असते ती त्यांनी अपीलकर्त्यास देणे बंधनकारक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ३ ही अपिले (क्र. १०१२/२००९/कोल्हापूर, १०१३/२००९/कोल्हापूर व १०१७/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१६ / सांगली | श्री.शकील दिलावर मुजावर इस्लामपूर (मोमीन मुहल्ला), ता. वाळवा, जि. सांगली | व्यवस्थापक, श्री.एम.डी.पवार पिपल्स सह.बँक लि. उरुण , इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली | सहकार आयुक्त, व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट राज्य, पुणे | दि. ५/१२/१९९६ ते दि. १५/११/२००८ या कालावधीतील खाते नं. ८०/४ च्या पूर्ण बायोडेटा, तसेच खात्यावर घेतलेल्या कर्जावर लावण्यात आलेला व्याज दर, इ. एकूण ६ मुद्दयांची माहिती | १. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन, क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे.<br>२. अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १४/१/०९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे.<br>३. नियंत्रक अधिकारी म्हणून नागरी सहकारी बँकांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे ती त्या त्या कार्यालयाने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. |
| २ | १०१७ / सांगली | श्री.अशोक अप्पा चौगुले, रा. बुर्ली, ता. पलूस, जि. सांगली | तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, तासगांव, जि. सांगली | अधिक्षक, भूमी अभिलेख , सांगली मार्केटयार्ड, सेवागृह बिल्डिंग , सांगली | सन २००५ ते २००८ या कालावधीत रद्द केलेल्या गट नं १७८२ ते १७८५ची ता. १६/२/०६ व १७५९ च्या मोजणीच्या अनुषंगाने एकूण ३ मुद्दयांचा खुलासा | १. खुलासा आदि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाहीत.<br>२. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने, रद्द केलेल्या ग.नं.१७८२ ते १७८५ च्या मोजणीची तारीख व गट नं. १७५९ च्या अनुषंगाने माहिती ८ दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देऊन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा |
| ३ | ११६ / २००९ / सांगली | श्री.सिध्दप्पा किरत्याप्पा बिरादार मु.पो.बोर्गी खुर्द, ता. जत | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सांगली जिल्हा परिषद , सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | अपील अर्जावरुन माहिती अर्जातील मागणी स्पष्ट होत नाही. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ४ | ११७ / २००९ / सांगली | दत्तात्रय कृष्णाजी जोशी आशिर्वाद , टिंबर एरिया, मिरज, जि. सांगली | सहाय्यक संचालक , नगर रचना, सांगली | | नियमबाहय इमारत बांध्कामाच्या अनुषंगाने दि.७/७/२००८ रोजी दिलेल्या अर्जानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली याची माहिती | अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्याचे आढळत नाही. ते करावे. |
| ५ | ११८ / २००९ / सांगली | श्री.दिलीपराव सखाराम माने माने ॲण्ड माने ॲटोमोबाईल , | सह निबंधक सहकारी संस्था, ओ.आर. ऑफीस, शिवाजी चौक, | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली | सन १९९९ ते २००९ चा कालावधीतील वसंत सहकारी पाणी पुरवठा मर्या. | अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे या संस्थेत कार्यरत असणारे लोक किती व |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एस.टी.स्टॅण्ड समोर, इस्लामपूर, वाळवा, जि.सांगली | इस्लामपूर, जि. सांगली | | गोठखिंडी या संस्थेच्या नोंदणीची सत्य प्रत, संस्थेत कामकरणाऱ्यांची माहिती इ. ५ मुद्दयांची माहिती | ते केव्हापासून कार्यरत आहेत याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र.१०१६ / सांगली, १०१७ / सांगली, ११६ / २००९ / सांगली, ११७ / २००९ / सांगली, १६५ / २००९ / सांगली, ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १०१७/सांगली १६५/२००९/सांगली, व मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन जन माहिती अधिकारी यांनी अनुपालन अहवाल आयोगास विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. ०८.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०३९/ २००९/ कोल्हापूर | श्री. तुकाराम गणू पाटील मु.पो.खाटांगळे, ता.करवीर, जि.कोल्हापूर | कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाहूपुरी, कोल्हापूर | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर | श्री ज्योतिर्लिंग सहकारी संस्था मर्या., खटांगळे ची थकबाकी यादी कर्जमाफीची यादी | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | १०२२/ २००९/ कोल्हापूर | श्री. श्रीकांत गोपाळ देशपांडे इंदिरा हौसिंग सोसायटी, कबनूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर | अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर | आजरा अर्बन को-ऑप बँक, शाखा कबनूर यांनी पोलीस संरक्षण मिळणेकरिता दिलेला अर्ज यासह एकूण सात मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने अपिला सोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत |
| ३ | ११८०/ २००९/ कोल्हापूर | श्री. संपत पांडुरंग आबदार 'अवधूत' जय भवानी कॉलनी, रिंग रोड, फुलेवाडी, कोल्हापूर | सहायक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर | सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर अंतर्गत कार्यालयीन वेळेत दारुच्या नशेमध्ये शासकीय काम न करता शासनाचा पगार घेणा-या व देणा-या, तसेच मुख्यालयात न राहणा-या कर्मचा-यांची यादी | १) प्रथम अपिलावरील कार्यवाहीची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच अपीकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले आहे. २) मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम. २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ०३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपिल क्र. १०३९/२००९/कोल्हापूर, १०२२/२००९/कोल्हापूर व ११८०/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अंकुश विठ्ठलराव कोलते
मु.पो.वाकवस्ती, लोणी काळभोर, ता.हवेली, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे

— उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
हवेली उपविभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.७.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अंकुश विठ्ठलराव कोलते
मु.पो.वाकवस्ती, लोणी काळभोर, ता.हवेली, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी
तहसीलदार श्रीमती मोसमी चौधरी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे
यांचे प्रतिनिधी श्री. भुरकुंडे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे येथील गट क्रं.१९२६, सर्व्हे क्र.२६३ या वन खात्याच्या जागेचा सन १९३० पासूनच्या ७/१२ चा उतारा, ८-अ उतारे, व वन जमिनीच्या लगत जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या दिलेल्या जमिनीचे ७/१२ उतारे व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

मौजे लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे येथील गट क्रं.१९२६, सर्व्हे क्र.२६३ या वन खात्याच्या जागेच्या सन १९३० पासूनच्या ७/१२ च्या उताऱ्यासह विविध कागदपत्रांची मागणी अपीलकर्ता श्री. अंकुश विठ्ठलराव कोलते यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, जि. पुणे यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी काही माहिती दिली व ऊर्वरित माहिती तहसीलदार, हवेली यांच्याकडे असल्यामुळे ती देण्याचे तहसीलदारांना कळविले. संपूर्ण व खरी माहिती न मिळाल्याच्या कारणावरून श्री. कोलते यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती दिलेली आहे. श्री. कोलते यांनी मागणी केलेली अन्य कागदपत्रे तहसीलदार, हवेली यांच्याकडून उपलब्ध करून घेऊन श्री. कोलते यांना पाहण्यास देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती योग्य ते शुल्क आकारून पंधरा दिवसांत द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले. याविरूध्द श्री. कोलते यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला लिहिता येत नसल्यामुळे आपण आपले मुद्दे अन्य व्यक्तीला सांगून अर्ज लिहून घेतला. वन खात्याची व शेतकऱ्यांची जमीन असे एकत्रीकरण करून शेतकऱ्यांची दिशाभूल करून अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे अनेक गोरगरीब कुटुंबांचे नुकसान केले आहे. शासकीय अधिकारी, बांधकाम व्यावसायिक आदींचा त्यात समावेश असून आपली जमीनही बनावट कागदपत्रे तयार करून बेकायदेशीरपणे ताब्यात घेतली आहे. श्री. दत्तात्रय पर्बती शिंदे - १००८ देवपुरी व धुंदी महाराज यांनी तहसीलदार, हवेली व उपविभागीय अधिकारी, पुणे यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करून वन खात्याच्या जमिनीतील झाडे तोडली, मुरूम, माती विकली व तेथे उदरनिर्वाह करणाऱ्या शेकडो व्यक्तींना बेरोजगार केले. त्यामुळे गेल्या आठ वर्षांपासून आपण या प्रकरणी लढा देत आहोत, असे प्रतिपादन श्री. कोलते यांनी लेखी व तोंडी केले.

श्री. कोलते हे मंत्रालयापासून स्थानिक पातळीपर्यंत विविध ठिकाणी याबाबतचे अर्ज वेळोवेळी करीत आले आहेत. त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे व त्यांच्या तक्रारींची पूर्ण चौकशी करून

विभागीय आयुक्तांना यापूर्वीच अहवाल सादर करण्यात आला आहे. तसेच श्री. कोलते यांनाही याबाबत वेळोवेळी कळविले आहे. आपल्या खाजगी मालकीच्या जमिनीवर अन्य व्यक्तीचे अतिक्रमण, श्री तीर्थ रामदरा देवस्थान यांच्याकडील जमिनीतील फळबागेचे श्री. कोलते यांच्याकडून काढून घेतलेले काम आदी बाबी व्यक्तिगत स्वरूपाच्या असून बनावट कागदपत्रे, चुकीची खरेदीखते आदी बाबत वेगवेगळ्या माध्यमातून ते तक्रारी करीत आले आहेत. आवश्यक तर त्यांनी न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे, हे वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी सौ. मोसमी चौगुले यांनी पूरक कागदपत्रांसह प्रतिपादन केले.

मंत्रालयातून आपल्याला मिळालेली माहिती व तहसीलदार, हवेली व जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातून मिळालेली माहिती यात फरक आहे. मुख्यमंत्र्यांना व विभागीय आयुक्तांना दिलेल्या माहितीत गट क्र.१९२६ वन खात्याकडील असून सन १९३० पासूनचा त्यात उल्लेख आहे. तहसीलदार, हवेली व जिल्हाधिकारी कार्यालय मात्र गट क्र.१९२६ हा सन १९३० मध्ये नसल्याचे म्हणत आहे, तसेच आजूबाजूंचे सर्व्हे नंबरही दिले जात नाहीत, असे निवेदन श्री. कोलते यांनी केले.

वन खात्याची व शेतकऱ्यांची जमीन बनावट कागदपत्रे करून हडप केली गेली का, याविषयीचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत करता येणार नाही. श्री. कोलते यांनी उपस्थित केलेल्या अशा स्वरूपाच्या प्रश्नांबाबत उचित न्यायालयात दाद मागण्याचा मार्ग श्री. कोलते यांना उपलब्ध आहे. परंतु मंत्रालयातून मिळालेली माहिती व तहसीलदार, हवेली व जिल्हाधिकारी, पुणे या कार्यालयाने दिलेली माहिती यात तफावत आहे का, तसेच असल्यास चुकीची माहिती कोणी व का दिली, या मुद्दयांचा विचार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करणे आवश्यक आहे. म्हणून संबंधित कागदपत्रांसह माहितीची तपासणी करून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांनी आयोगाला १५ दिवसांत अहवाल सादर करावा, व संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रती श्री. कोलते यांना निःशुल्क द्याव्या, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पुणे (भाग हवेली ) यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने दि. ४.८.२००८ रोजी आयोगाला अहवाल सादर केला, त्यात पुढीलप्रमाणे निवेदन केले आहे :

श्री. कोलते यांच्या मागणीनुसार कामगार तलाठी, लोणी काळभोर यांनी गाव कामगार कोतवाल यांना अर्जदार यांच्याकडे सर्व कागदपत्रे घेऊन समक्ष पाठविले असता, श्री. कोलते यांनी सदरची कागदपत्रे घेण्यास नकार दिला आहे. तसा अहवाल कामगार तलाठी यांनी तहसीलदार, हवेली यांच्याकडे दि. २६.७.२००८

अन्वये सादर केला आहे, श्री. कोलते यांनी मागणी केलेली कागदपत्रे घेण्यास नकार दिल्याने तहसीलदार, हवेली यांनी त्यांचेकडील पत्र क्र.म.अ./अभिलेख/वशी/३४२/०८ दि. ३१.७.२००८ अन्वये श्री. कोलते यांना मागणी केलेली कागदपत्रे रजिस्टर पोस्टाने पाठविली. विषयांकित गटाची व गटवारी अस्तित्वात येणे पूर्वीचे संबंधित सर्व्हे नंबरचे उतारे व इतर सर्व कागदपत्रे देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. श्री. कोलते यांचे म्हणणे असे आहे की, १९३० सालातील गट नंबर १९२६ चा ७/१२ उतारा मिळावा. परंतु सन १९३० साली श्रीराम मंदिर व तळे असा उल्लेख असलेला ७/१२ हा स.नं.२६३ चा असून सन १९८२ मध्ये एकत्रीकरण कायद्यानुसार जी गटवारी झाली त्यामध्ये स.नं.२६३ या जमिनीला गट नं.१९२६ असा देण्यात आलेला आहे. त्यामुळे सन १९३० ते १९८२ पर्यंत स.नं. २६३ चा ७/१२ उतारा व १९८२ नंतर त्याच जमिनीचा गट नंबर १९२६ चा ७/१२ उतारा श्री. कोलते यांना दिलेला आहे.

या व्यतिरिक्त आणखी कागदपत्रे हवी असल्यास त्यांनी मागणी केल्या प्रमाणे कागदपत्रे त्वरित पुरविण्यात येतील, असेही तहसीलदार, हवेली यांनी श्री. कोलते यांना कळविले आहे.

आपल्याला २ किलो १५४ ग्रॅम कागद पोस्टाने पाठविण्यात आले. ते सर्व कागद बनावट आहेत, असे निवेदन श्री. कोलते यांनी दि. ११.८.२००८ रोजी आयोगाला सादर केले. मात्र वरील कागदपत्रे बनावट असण्याबाबतचा कोणताही पुरावा त्यांनी सादर केलेला नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याची दखल घेता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०९.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०४२/ २००९/ पुणे | श्री.कांताराम तात्याबा काळे मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, पोलीस उपमहानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, कोल्हापूर | अपिलीय प्राधिकारी, पोलीस उपमहानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, कोल्हापूर | घोडेगाव पोलीस स्टेशनला देण्यात आलेल्या जबाबाच्या प्रती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | १०४५/ २००९/ पुणे | श्रीमती शामाबाई गोविंद पिलाणे तर्फे मुखत्यारधारक श्री.रामदास ज्ञानोबा कामठे कामठे तालीम समोर, माऊली निवास, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे | सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे-१), गुन्हे शाखा, पुणे शहर, पुणे | पोलीस उप आयुक्त (गुन्हे), गुन्हे शाखा, पुणे शहर, पुणे | महमंदवाडी जमीन सर्वे नं.२५/३/१ या जमिनीच्या बनावट कागदपत्रांच्या अनुषंगाने कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं.२४९/०९ बाबत श्री.किशोर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खंडणी विरोधी पथक यांनी केलेल्या चौकशीविषयक एकूण १२ मुद्दयांची माहिती | प्रस्तुत प्रकरणात गुन्ह्याचा तपास चालू असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम ८(ज) नुसार तपास पूर्ण होईपर्यंत माहिती देता येणार नाही, असा जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. तपास पूर्ण होताच संबंधित माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०६०/ २००९ / पुणे | श्री.ज्ञानेश्वर विश्वनाथ वाळुंज मु.नांदुर, पो.कळंब, ता.आंबेगाव, जि.पुणे | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय घोडेगाव, ता.घोडेगाव, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय घोडेगाव, ता.घोडेगाव, जि.पुणे | मौजे नांदूर येथील गट नं.२२/१, २२/४, २२/५, २४/१ अ व २४/६ मधील नोंदी दुरुस्ती करुन देणे | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती प्रशासकीय कार्यवाहीची असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील एकूण ०३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. १०४२/२००९/पुणे, १०४५/पुणे, ५०९/२००९/पुणे व १०६०/२००९/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४ -०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश आत्माराम सोमण
स.नं.३०१, राधिका को-ऑप.हौसिंग सोसायटी,
गार्डन व्ह्यू, पर्वतीनगर, सिंहगड रोड, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पर्वती विभाग उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पर्वती विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४७ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७. ७ .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश आत्माराम सोमण
स.नं.३०१, राधिका को-ऑप.हौसिंग सोसायटी,
गार्डन व्ह्यू, पर्वतीनगर, सिंहगड रोड, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पर्वती विभाग श्री.म.वि. दिवाकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पर्वती विभाग सौ.एस.एस.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.४.२००७, २३.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.६.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मे.टी वॉकर फॉर्मास्युटीकल लॅब खालीलप्रमाणे ग्राहक नं.१७००१२८४४८२७ या बिलावर हायलाईट लाल रेघ मारलेल्या दि.२०.७.२००१ रोजीच्या बिलावर रु.८६००० स्वीकारण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी लेखी स्वरुपात दिलेल्या सूचना व सी.पी.एल. वर दिलेल्या सूचनांची संबंधित सर्व कागदपत्रे. | |

## विवेचन

वीज बिलावर थकबाकीपैकी काही रक्कम स्वीकारण्याबाबत कार्यकारी अभियंता, पर्वती विभाग, पुणे यांनी लेखी स्वरुपात दिलेल्या सूचनांची व आदेशाची प्रत अपीलकर्ता श्री.प्रकाश आत्माराम सोमण यांनी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पर्वती विभाग, पुणे यांच्याकडे मागितली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील सुनावणीनंतरही जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता श्री.प्रकाश आत्माराम सोमण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कागदपत्रे जुनी असल्याने व संबंधित ग्राहक पूर्वी कोथरुड विभागात असल्याने संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करुन माहिती मिळविण्याचे पूर्ण प्रयत्न केले. परंतु अशी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तसेच मूळ विषय ज्या ग्राहकाबाबतचा आहे त्यांची तक्रार राहिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी सौ.एस.एस.कुलकर्णी व अपिलीय प्राधिकारी श्री.म.वि.दिवाकर यांनी दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले.

कागदपत्रे उपलब्ध नाहीत, हे म्हणणे पूर्णत: खोटे आहे. ही सर्व कागदपत्रे स्वतंत्रपणे जतन करण्यात येत असल्यामुळे माहिती उपलब्ध आहे. परंतु त्यातून गैरकारभार, भ्रष्ट कारभार व बेकायदेशीर व्यवहार उघड होत असल्यामुळे माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री.सोमण यांनी केले. बिलावर सूचना लिहिलेल्या होत्या, त्याबाबत स्पष्टीकरण मिळणे आवश्यक होते, ते मिळाले नाही, असे श्री.सोमण यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले.

श्री.व्ही.डी.येरवडेकर यांनी नवी पेठ, पुणे येथे बांधकामासाठी विद्युत पुरवठा करण्यासंबंधाने जून २००६ मध्ये अर्ज केला. या जागेवर पूर्वी मे.तळवलकर फार्मास्युटीकल्स नावाचा ग्राहक होता. जून १९९८ मध्ये तेथील विद्युत पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात आला होता. सदर ग्राहकाबाबतच्या नोंदीवरुन या ग्राहकाने दि.३०.६.२००१ रोजी रु.८६००० भरले असून थकबाकी तीन लाख ८६ हजार ६६९.३५ रुपये दिसत होती. रु.८६ हजार स्वीकारण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी लेखी स्वरुपात दिलेल्या सूचनांच्या व अन्य संबंधित कागदपत्रांच्या प्रती श्री.सोमण यांनी मागितल्या होत्या. कोथरुड विभागाचे विभाजन ऑगस्ट २००० मध्ये झाले व पर्वती विभाग स्वतंत्र झाला. सदर ग्राहक १९९९ मध्ये कायमस्वरुपी खंडित असल्यामुळे पर्वती विभागाकडे वर्ग करण्यात आला नाही. त्यामुळे संबंधित कागदपत्रे ही पर्वती विभागाकडे देण्यात आली नव्हती. श्री.सोमण यांनी मागितलेली कागदपत्रे जून २००१ मधील आहेत. पर्वती विभागाच्या विभागीय कार्यालयाचे स्थलांतर सन २००३ मध्ये झाले. या सर्व बाबी लक्षात घेता विविध विभागांकडे संपर्क साधून माहिती देण्यास प्रयत्न केले. दरम्यान मूळ ग्राहकाने दि.२४.९.२००७ रोजी रु.३,८२७० ही थकबाकी भरली व नवीन एच.टी.कनेक्शन मंजुरी देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री.म.वि.दिवाकर यांनी केले.

वरील बाबी लक्षात घेता माहिती जाणीवपूर्वक टाळण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेला नाही. विविध विभागांशी संपर्क साधून माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे व मूळ विषय निकाली निघाला आहे, असे दिसते.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत बाबी गुरव
तिरुपतीनगर, विश्वधारम् बिल्डिंग नं.१०/२,
फ्लॅट नं.८/बी, वारजे जकात नाका, पुणे-४११०५८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४९ /पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७ . ७ .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत बाबी गुरव
तिरुपतीनगर, विश्वधारम् बिल्डिंग नं.१०/२,
फ्लॅट नं.८/बी, वारजे जकात नाका, पुणे-४११०५८

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे श्री.प्रकाश पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे श्री.दि.ल.पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.३.२००७, दि.२५.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.४.२००७, दि.१३.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

शेती महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना दिलेली महागाई भत्ता वाढ, स्वेच्छानिवृत्ती आदि संदर्भातील १२ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.वसंब बाबी गुरव यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन) यांच्याकडे मागितली होती. याच विषयावर राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्यापुढे यापूर्वी श्री.गुरव यांनी केलेल्या अपिलात दि.६.२.२००६, दि.१९.४.२००६ चे प्रथम अपील राज्य मुख्य माहिती आयोगाच्या आदेशानंतर दि.२०.१२.२००६ यावेळी ही माहिती देण्यात आली आहे, असे नमूद करुन जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन) यांनी ऊर्वरित एका मुद्दयाची माहिती दिली व 'महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संचालक मंडळासमोर सादर करण्यात आलेल्या टिपण्या हे पब्लीक डॉक्युमेंट नसल्यामुळे देता येणार नाही,' असे जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश पाटील यांनी कळविले. श्री.गुरव यांनी विहित मुदतीत अपील न केल्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले. त्याविरुध्द श्री.गुरव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२९.३.२००७ व दि.२५.५.२००७ रोजी श्री.गुरव यांनी केलेल्या अर्जावर विहित मुदतीत त्यांना माहिती देण्यात आली आहे. याच मुद्दयाची माहिती राज्य मुख्य माहिती आयुक्तांपुढे चाललेल्या अन्य अपिलाच्या वेळीही त्यांना देण्यात आलेली होती. संचालक मंडळापुढे ठेवण्यात आलेल्या टिपण्यांची त्यांची मागणी आहे, हे पब्लीक डॉक्युमेंट नसल्याचे यापूर्वी कळविण्यात आले होते, परंतु बैठकीत आयत्या वेळचा विषय असल्याने अशी टिपणीच उपलब्ध नसल्याचे अपिलीय

प्राधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ श्री.प्रकाश पाटील यांनी नमूद केले. राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी दिलेला निकाल व त्या संदर्भातील पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. या अपिलातील कार्यवाहीबाबतचा अहवाल आठ दिवसात सादर करावा व श्री.गुरव यांना तसे स्पष्टीकरणात्मक पत्र द्यावे, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार त्याच दिवशी-दि.१८.७.२००८ रोजी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह स्पष्टीकरणात्मक पत्र श्री.गुरव यांना देण्यात आल्याचे श्री.प्रकाश पाटील यांनी आयोगाला सादर केले.

राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी निकाल दिलेला असतानाही एकाच माहितीसाठी पुन्हा अर्ज व अपिले करणे ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१०.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०६३/ २००९/ पुणे | श्री.विकी विक्रम कुमार द्वारा श्री.संजय बाबूराव हाटकर ८/१४, इंदिरा शंकर नगरी, व्ही.एस.७, कोथरुड, पुणे-२९ | जन माहिती अधिकारी, सेंट मेरी स्कूल, ५- बी, जनरल भगत मार्ग, पुणे-१ | अपिलीय प्राधिकारी, सेंट मेरी स्कूल, ५- बी, जनरल भगत मार्ग, पुणे-१ | शैक्षणिक वर्ष (२००८-२००९) या कालावधीतील प्रवेश प्रक्रियेसंबंधात एकूण ०७ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/- ) चे मुद्रांक जोडलेले नाही. |
| २ | १०७६/ २००९/ पुणे | श्री.प्रकाश दत्तात्रय मांगले दत्तप्रभा, ४८, विवेक सोसायटी, पुणे -९ | सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, पुणे | पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, पुणे | सदाशिव पेठेतील उंबऱ्या गणपती चौक (शगून चौक) ते एस.पी.कॉलेज चौक पर्यंतच्या अंतरात एकेरी वाहतूक मोडल्याबाबत माहे फेब्रुवारी २००९ मध्ये किती लोकांवर कारवाई झाली. तसेच वहातुकीच्या अनुषंगाने एकूण ०५ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्यान अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०७७/ २००९/ पुणे | श्री.प्रकाश दत्तात्रय मांगले दत्तप्रभा, ४८, विवेक सोसायटी, पुणे -९ | नगर उप अभियंता, (पर्वती जलकेंद्र), पुणे महानगर-पालिका, पुणे | उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगर - पालिका, पुणे | पंपिंग स्टेशनचा आवाज कमी करणेबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही, क्षेत्रिय अधिकारी यांनी पाणी मीटरबाबत पाण्याचा अपव्यय टाळण्याबाबत दक्षता घेतली नाही व वाहतुक कोंडी टाळण्यासाठी स्थळ पाहणी करुन सुधारणा केली नाही. | अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची आहे, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील एकूण ०३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. १०६३/२००९/पुणे, १०७६/२००९/पुणे व १०७७/२००९/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२ -०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.स्मिता बाळकृष्ण कुलकर्णी
आनंद कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं.१, स.नं.३३/१ विद्यानगर,
एअरपोर्ट रोड, पुणे-४११०३२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिन्युअल इन महाराष्ट्र

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापन विभागप्रमुख,
ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिन्युअल इन महाराष्ट्र

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८१+१०६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.स्मिता बाळकृष्ण कुलकर्णी
आनंद कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं.१, स.नं.३३/१ विद्यानगर,
एअरपोर्ट रोड, पुणे-४११०३२

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिन्युअल इन महाराष्ट्र

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापन विभागप्रमुख,
ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिन्युअल इन महाराष्ट्र

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.६.२००७, दि.४.७.२००७, दि.२३.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** ( प्रत सोबत जोडली आहे. ) | |

## विवेचन

ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिन्युअल इन महाराष्ट्र (अफार्म)(महाराष्ट्र कृषीवर्धिनी) या संस्थेच्या संदर्भातील माहिती मागणाऱ्या दोन अर्जांवरील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीविरुध्द व संपूर्ण माहिती मिळावी यासाठी श्रीमती स्मिता बाळकृष्ण कुलकर्णी, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी, ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिन्युअल इन महाराष्ट्र यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्रीमती कुलकर्णी या अफार्ममध्ये कार्यकारी अधिकारी होत्या. संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष डॉ.मुकुंद अनंत घारे हे व्यक्तिगत व खाजगी कामासाठी अफार्मच्या संसाधनांचा वापर करतात, तसेच संस्थेत अनेक गैरप्रकार आहेत, म्हणून आपण ही माहिती मागत आहोत, असे श्रीमती कुलकर्णी यांनी वेळोवेळी सादर केलेल्या निवेदनांमध्ये, पत्रव्यवहारात, तसेच माहिती-मागणीच्या व अपील अर्जांमध्ये म्हटले आहे.

श्रीमती कुलकर्णी यांनी दि.२३.६.२००७ रोजी पहिला अर्ज केला. ऑक्टोबर १९९४ ते नोव्हेंबर २००६ या बारा वर्षांच्या कालावधीतील माहिती त्यांनी मागितली होती. अफार्मच्या धोरणानुसार नमूद केलेली काही कागदपत्रे वगळता आठ वर्षांपूर्वीचे ऊर्वरित अभिलेख नष्ट करण्यात आलेले असल्यामुळे ऑक्टोबर १९९८ ते नोव्हेंबर २००६ या कालावधीतील माहिती देता

राहणे याचा अर्थ आपल्याला माहिती देण्यास मुद्दाम दिरंगाई करणे, माहिती मिळण्यापासून वंचित ठेवणे, वा आपला माहिती मिळविण्याचा अधिकार नाकारणे असा होतो,' असे श्रीमती कुलकर्णी यांनी लेखी व तोंडी नमूद केले आहे. अशा स्वरुपाचे भाष्य श्रीमती कुलकर्णी यांनी सर्व लेखी निवेदनांमध्ये व माहिती-मागणीच्या मूळ अर्जामध्येही केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसांत उत्तर द्यावयाचे आहे, त्यामुहे त्यांचा आक्षेप निरर्थक ठरतो.

अफार्मला भरीव शासकीय अनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे पुनर्निरीक्षण करुन हा कायदा अफार्मला लागू होत नसल्याचे श्रीमती कुलकर्णी यांना कळविले, असे अफार्मचे अध्यक्ष श्री.रामभाऊ चव्हाण यांनी ३०.११.२००७ व दि.१५.७.२००८ च्या लेखी निवेदनांद्वारे आयोगाला कळविले. हीच भूमिका संस्थेच्या प्रतिनिधींनी अन्य निवेदनांमध्ये व आयोगापुढील सुनावणीतही मांडली. त्याचाच पुनरुच्चार श्री.तांबोळी व श्रीमती करमुडी यांनी सुनावणीत केला. श्रीमती कुलकर्णी यांना पहिल्या अर्जानुसार माहिती देण्यात आली, परंतु संस्थेची बदनामी करण्याची त्यांची भूमिका अर्जावरील मुद्दयांवरुन स्पष्ट होते. तसेच या अर्जाच्या व पत्रव्यवहारांच्या प्रती सभासदांना पाठविण्यातही त्यांचा हेतू शुध्द नसल्याचे स्पष्ट होते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

अफार्म ही सार्वजनिक संस्था आहे, त्यामुळे सर्वांना आपले म्हणणे कळावे म्हणून आपण प्रती पाठविल्या. श्री.घारे यांनी संस्थेच्या संसाधनांचा स्वतः व स्वतःच्या कुटुंबियांसाठी गैरवापर केला, स्वतःच्या खाजगी कंपनीला कर्ज दिले, अशासारखे गैरप्रकार उघड होऊ नयेत म्हणून आपल्याला माहिती नाकारली जात आहे. अफार्मला शासकीय मदत मिळते, परदेशांमधून निधी मिळतो, प्रारंभीच्या काळामध्ये संस्थेने जन माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती, तसेच अफार्मच्या कार्यकारी मंडळाच्या व सर्वसाधारण सभेच्या बैठकीत आपल्या अर्जाविषयीची माहिती देण्यात आली असून, इतिवृत्तांमध्ये त्याच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. आपण माहितीच्या अधिकाराखाली मागितलेल्या माहितीचा उल्लेख करुन संस्थेच्या लेखापरीक्षकांनी विश्वस्तांकडून

येईल, असे नमूद करुन रु.१०,००० शुल्क भरण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती रोहिणी करमुडी यांनी त्यांना कळविले. श्रीमती कुलकर्णी यांनी ते शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी आठ वर्षांची माहिती दिली. परंतु ती पुरेशी व समाधानकारक नाही, म्हणून श्रीमती कुलकर्णी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही. दरम्यान त्याच स्वरुपाची माहिती मागणारा दुसरा अर्ज श्रीमती कुलकर्णी यांनी दि.२३.७.२००७ रोजी केला. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही.

अफार्मला भरघोस शासकीय अनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे अफार्मचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.सुभाष तांबोळी यांनी दि.२१.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती कुलकर्णी यांना कळविले व त्यांनी भरलेले शुल्क परत केले. 'आपण मागत असलेली माहिती सूडबुध्दीने व पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन ठेवून संस्थेचे अध्यक्ष व अन्य विश्वस्तांना बदनाम करण्याच्या हेतूने मागितली असल्याने सदरची माहिती आपणास मुळीच दिली जाणार नाही, तेव्हा हा विषय अफार्मच्या दृष्टीने येथेच संपला आहे, असे जाहीर करुन आपणांस असे कळविण्यात येत आहे की, येथून पुढे आपल्या कोणत्याही पत्रांची वा अर्जाची दखल घेतली जाणार नाही वा त्यास उत्तर दिले जाणार नाही,' असे श्री.तांबोळी यांनी या पत्रात कळविले. श्रीमती कुलकर्णी यांनी माहिती-मागणीसाठी केलेले अर्ज व इतर पत्रव्यवहार याच्या प्रती अफार्मचे सदस्य, मदत करणाऱ्या संस्था आदींकडे पाठविले. यावरुन 'माहिती घेणे हा उद्देश नसून डॉ.घारे यांना बदनाम करण्याचा व अफार्मचे विश्वस्त, तसेच कर्मचारी यांना त्रास देण्याचा आपला कुटील डाव आहे,' असेही त्यांनी या पत्रात म्हटले आहे. त्याचाच पुनरुच्चार श्री.तांबोळी व श्रीमती करमुडी यांनी आयोगापुढील सुनावणीत केला.

श्रीमती कुलकर्णी यांनी दि.१४.७.२००७ रोजी केलेल्या अर्जात २२ मुद्दयांची व दि.२३.७.२००७ रोजी केलेल्या अर्जात २६ मुद्दयांची माहिती मागितली आहे. 'आपल्या अर्जावर २२ दिवसांनी जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर पाठविले. त्वरित कार्यवाही न करता २२ दिवस गप्प

लेखी खुलासे मागविले आहेत व विश्वस्तांनी तसे खुलासे केले आहेत, असे प्रतिपादन श्रीमती कुलकर्णी यांनी लेखी व तोंडी केले. मात्र संस्थेला राज्य व केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान व इतर मदत संस्थेच्या एकूण वार्षिक जमा रकमांच्या तुलनेत अतिशय कमी म्हणजे दहा वीस टक्क्यांपेक्षा कमी असल्याने ती भरघोस (substantial) नाही, असे अध्यक्ष श्री.रामभाऊ चव्हाण यांच्या लेखी निवेदनातील प्रतिपादन त्यांचे प्रतिनिधी श्री.सुभाष तांबोळी यांनी नमूद केले.

या अनुषंगाने, अफार्मला मिळणाऱ्या अनुदानाच्या संदर्भातील तपशील श्रीमती कुलकर्णी यांनी आयोगाला सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

श्रीमती कुलकर्णी यांनी दि.७.९.२००९ रोजी आयोगाला निवेदन सादर केले असून अफार्मला केंद्र व राज्य सरकार, तसेच काही स्थानिक स्वराज्य संस्था यांसह मदत देणारी वीस शासकीय; निमशासकीय संस्था, व कार्यालयांची नांवे नमूद केली आहेत. त्यात रकमेचा अथवा अन्य कोणताही तपशील दिलेला नाही. मात्र संस्थेचे सन २००५ ते २००८ या तीन वर्षांचे वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल अध्यक्ष श्री.रामभाऊ चव्हाण यांनी आयोगाला सादर केले आहेत. त्यातील तपशील पाहता संस्थेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपात मिळणारी आर्थिक शासकीय मदत भरीव आहे. तसेच शासनाच्या अनेक योजना संस्थेमार्फत राबविल्या जात असून शासकीय यंत्रणेचाही संस्थेच्या कार्यात मदतकारक सहभाग आहे, असे दिसते. या बाबी लक्षात घेता, संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही, हे प्रतिपादन मान्य करता येणार नाही. मात्र श्रीमती कुलकर्णी या संस्थांतर्गत व्यक्तिगत मतभेदाच्या कारणातून विविध स्वरुपाचे आरोप व वेगवेगळ्या पातळ्यांवर पत्रव्यवहार करीत आहेत, असे श्रीमती कुलकर्णी यांनी सादर केलेली कागदपत्रे व त्यांचे निवेदन यावरुन स्पष्ट होते. माहिती-मागणीच्या अर्जात तसेच अपील अर्जात व्यक्तिशः डॉ.घारे यांच्यावर त्यांनी अनेक आरोप केले आहेत व त्या अनुषंगानेच माहिती मागितली आहे. ते पाहता माहितीच्या अधिकाराचा उपयोग त्या नेमके कशासाठी करु इच्छितात, याबाबत साशंकता निर्माण होते. त्यांच्या दोनही अर्जांचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर आरोपांच्या स्वरुपाची, त्याबाबत खुलासे अथवा भाष्य मागणारी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ मधील व्याख्येनुसार 'माहिती' ठरत नाही. म्हणून अफार्म या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत असला तरी श्रीमती कुलकर्णी यांच्या मागणीपैकी जी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या व्याख्येत बसेल तेवढीच देय ठरेल.

उभय बाजूंची निवेदने व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य.

(२) ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिन्युअल इन महाराष्ट्र (अफार्म)(महाराष्ट्र कृषीवर्धिनी) या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे.

(३) अपीलकर्त्या श्रीमती कुलकर्णी यांनी मागणी केलेल्यातील देय माहिती नियमानुसार योग्य ते शुल्क आकारुन द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१०.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण म्हाळू खंडागळे
मु.पो.रेटवडी, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८२ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.७.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मण म्हाळू खंडागळे
मु.पो.रेटवडी, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री.प्रकाश परब

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री.प्रकाश परब

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.३.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.आवारी व श्री.गुंजाळ, उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांनी नूतन विद्यालय, रेटवडी, ता.खेड, जि.पुणे या शाळेला भेट दिली व त्या भेटीमध्ये श्री.आर.एम.पवार, मुख्याध्यापक यांच्या दोषारोपाबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी यांना सादर केला, त्या अहवालाची माहिती. श्री.पवार यांना निलंबित करण्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दि.२.२.२००५ रोजी जा.क्र.निलंबन/०५/८६ ने संस्थेला दिलेले पत्र, दि.४.२.२००५ रोजी श्री.पवार यांना निलंबन करणची दि.२.२.२००५ ची परवानगी दि.४.२.२००५ रोजीचे पत्राने रद्द करण्यात येत आहे याबाबत कोणत्या माहितीचे आधारे दि.२.२.२००५ ची निलंबनाची परवानगी रद्द केली, ती माहिती. | |

## विवेचन

मुख्याध्यापक श्री.आर.एम.पवार यांना निलंबित करण्याची शिक्षण अधिकाऱ्यांनी संस्थेला दि.२.२.२००५ रोजी दिलेली परवानगी दि.४.२.२००५ च्या पत्रान्वये रद्द केली, ती कोणत्या माहितीच्या आधारे, याची माहिती अपीलकर्ता श्री.लक्ष्मण म्हाळू खंडागळे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी ती दिली नाही, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही आपल्याला अपुरी व चुकीची माहिती मिळाली, तसेच माहिती पाठविल्याचा चुकीचा पत्रव्यवहार शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, पुणे हे करीत राहिले आहेत, अशा कारणावरुन श्री.खंडागळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१७.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला अद्याप माहिती मिळाली नसल्याचे श्री.खंडागळे यांनी प्रपत्रात नमूद केले. फेब्रुवारी २००५ मध्ये असलेल्या सर्व अधिकाऱ्यांची बदली व दप्तराची हलवाहलव झाल्याने चौकशी अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून श्री.खंडागळे यांना पाठविला. दि.४.२.२००५ च्या

पत्राबाबतची टिपणी अंथवा कागदपत्रे कार्यालयात नाहीत. हे पत्र देणाऱ्या अधिकाऱ्याची बदली झाली, शोधूनही कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्यामुळे देता आली नाहीत, टिपणी तयार न होता पत्र दिल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे जी माहिती मुळातच नाही ती देता आली नाही, अशी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची भूमिका आहे. 'दि.४.२.२००५ चे पत्र संशयास्पद आहे, असे चर्चेत सूचित झाले. त्या पत्राची चौकशी होणे योग्य वाटते,' असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद श्री.प्रकाश परब यांनी प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. शिक्षणाधिकारी श्री.परब यांनी संबंधित पत्राबाबत चौकशी करुन एक महिन्यात आयोगाला अहवाल सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. अपीलकर्त्याने हा अहवाल प्राप्त न झाल्याच्या तक्रारी आयोगाकडे वारंवार केल्या, परंतु श्री.परब यांनी विहित मुदतीत अहवाल सादर केला नाही. त्याबाबत आयोगाने जाणीव दिल्यानंतर दि.१७.८.२००९ रोजी श्री.परब यांनी अहवाल सादर केला. 'सदरहू नस्ती प्रकरणी चौकशी करण्याचे काम या कार्यालयातील अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले होते. याबाबत चौकशी केली असून अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. त्याचे अवलोकन करता खालील बाबी निदर्शनास येतात- (अ) श्री.खंडागळे यांनी नमूद केलेले पत्र या कार्यालयाचे जावक शाखेमार्फत पाठविण्यात आलेले नाही. (ब) आदेशाच्या छायांकित प्रतीवरुन सदरहू स्वाक्षरी तत्कालीन अधीक्षक श्रीमती एस.टी.रोकडे यांची वाटते. तथापि सदरहू पत्रावर त्यांचीच स्वाक्षरी आहे याची खात्री देता येत नाही, असे सेवानिवृत्त अधीक्षक यांचे निवेदन पाहता निदर्शनास येते,' असे श्री.परब यांनी या अहवालात नमूद केले आहे. श्री.परब यांनी चौकशी करण्याचे काम कोणत्या अधिकाऱ्याकडे व कोणत्या पत्रान्वये सोपविले होते, एक महिन्याची मुदत दिली असताना त्या मर्यादेत अहवाल सादर का केला गेला नाही, याचा खुलासा श्री.परब यांच्या निवेदनात नाही. ही गंभीर बाब आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) संबंधित नस्ती प्रकरणी चौकशी करण्याचे काम कोणत्या अधिकाऱ्याकडे, कोणत्या दिनांकास व कोणत्या आदेशान्वये सोपविण्यात आले होते, हे संबंधित पत्राच्या प्रतीसह शिक्षणाधिकारी श्री.प्रकाश परब यांनी दि.१५.९.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावे व संबंधित अधिकाऱ्याच्या चौकशी-अहवालाची प्रत आयोगाला सादर करावी व अपीलकर्त्यालाही द्यावी.

(३) आयोगाने दिलेल्या मुदतीत अहवाल सादर न केल्याबद्दल कारवाई का करु नये, याबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री.प्रकाश परब यांनी दि.१५.९.२००९ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेतः-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०८३/ २००९/ पुणे | श्री.प्रदीप आप्पाराव बुरांडे प्लॉट नं.९, नाना भालेराव कॉलनी, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | ओव्हरसिअर, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | नगरपरिषदेच्या वैशिष्ठ्यपूर्ण योजने-अंतर्गत आरक्षण क्र.६५, सुभाष मार्केट, सिटी सर्व्हे नं.५६७३ या इमारतीच्या बांधकामाच्या निविदेच्या अनुषंगाने एकूण ७ मुद्दे | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | १०८७/ २००९/ पुणे | श्री.महादेव बबन माळवदकर मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | - | सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई मार्फत शासकीय गट-विम्यातून मावळ पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील किती कर्मचाऱ्यांनी गृहकर्ज घेतले? त्यापैकी किती कर्जाची वसुली झाली ? ती शासनाकडे भरणा कशी केले जाते व कोणत्या लेखाशीर्षा-खाली जमा केली जाते,यासंबंधी माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच प्रथम अपील केल्याचे, सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०८९/ २००९/ पुणे | श्री.महादेव बबन माळवदकर मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | सन २००५ ते २००९ या कालावधीतील मावळ तालुक्यातील बी.एड.,एम.एड., एम.फील., पदवी प्रदान केलेल्या प्राथमिक शिक्षकांची माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. १०८३/२००९/पुणे, १०८७/२००९/पुणे व १०८९/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९-०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहिनीराज ओंकार
ग्राहक सदन, ६३४, सदाशिव पेठ,
फडतरे चौक, पुणे-३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक अभियता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. मोहिनीराज ओंकार
ग्राहक सदन, ६३४, सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. अनिरूध्द घन:श्याम पावसकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक अभियता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे
सौ. हर्षदा वि. शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे शहरासाठी मंजूर विकास आराखड्याप्रमाणे आरक्षित असलेल्या व संपादित केलेल्या जागांना दिलेली नुकसान भरपाई रक्कम व्याजासह परत घेऊन टी.डी.आर. देण्यात आलेल्या प्रकरणांबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मोहिनीराज ओंकार यांनी टी.डी.आर. बाबत मागितलेली माहिती पूर्वी दि.२०.३.२००७ च्या अर्जानुसार दि. ७.४.२००७ रोजी देण्यात आली. तीच माहिती मागणारा त्यांचा अन्य अर्ज व प्रथम अपील प्राप्त झालेले नाही. दि.१७.१२.२००७ ला त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. त्यानुसार दि. ३१.१२.२००७ रोजी माहिती देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका सौ. हर्षदा वि. शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका श्री. घनःश्याम पावस्कर यांनी केले.

दि. १६.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमास व दि.१२.८.२००९ च्या आयोगापुढील सुनावणीला अपीलकर्ता श्री. ओंकार उपस्थित नव्हते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.९.२००९**